# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब-क्षेत्रिय कार्यालय, एल्प्रो कंपनी परिसर, लिंक रोड, चिंचवडगांव, पुणे-३३.
(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)
Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in
दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३

जावक क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/ ९४ /२०१८ दिनाक ०८ /०६/२०१८

प्रति,
मा. श्री./श्रीमती------------------------------------------,
प्रभाग क्र.------------------------------------------,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

विषय : ब प्रभाग समितीची मासिक सभा दि. १२/०६/२०१८ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि. १२/०६/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली आहे. या पत्रासोबत सभेची कार्यपत्रिका पाठविण्यात येत आहे. तरी प्रस्तुत सभेस उपस्थित रहावे, हि विनंती

कळावे,

आपला विश्वासू

8.6.18

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

प्रत : सर्व संबंधित शाखा प्रमुख.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
ब प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्र. ३

दिनांक : १२/०६/२०१८.

वेळ : दुपारी १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक १२/०६/२०१८. रोजी दुपारी १२.३० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित केली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) मागील कार्यपत्रिका क्र. २, दि. ८/५/२०१८ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणे

विषय क्रमांक १ मौजे किवळे, माळवालेनगर स.नं.७५/२ब/१ याठिकाणी १८.०० मीटर रस्त्याच्या पुर्वेला रोडपासून अंदाजे १०० मीटरवर ४० ते ५० कुटूंब राहत असून, काही स्थानिक मंडळींनी त्यांचा येणे जाण्यासाठी असलेला रस्ता बंद करुन सदर गरीब कुटूंबांना लॅण्ड लॉक केले असून, सदर कुटूंबासाठी सर्व्हे नं.७५/१अ मधून मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी पुढील मिळकतीमधून १) कमाल गुलाब गाडे २) किसन बाळा तरस ३) लक्ष्मण तुकाराम तरस ४) जयवंत किसनराव नेटके यांच्या मिळकतीमधून कमीत कमी ६.०० मीटर रुंदीचा नियम २०५ नुसार रस्ता करुन दयावा व शेतक-यांना त्यांचा कायदेशीर योग्य तो मोबदला देऊन वरील प्रश्न सोडविण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक २ प्रभाग क्रमांक २२ कोकणेनगर काळेवाडी मधील एका कॉलनीचे पुर्वीचे नांव पंचरत्न कॉलनी असे होते पण आता हया कॉलनीचे नांव बदलून नवीन नांव शिवरत्न कॉलनी असे बदलण्यात आले आहें व कॉलनीतील नागरीकांच्या विदयुत बिल, आधार कार्डवर शिवरत्न कॉलनी असा उल्लेख आहे त्यामुळे बहुतांश नागरीकांच्या पत्रव्यवहारात असुविधा निर्माण होत आहे. हया कॉलनीचे नांव बदलण्यात सर्व नागरीकांचे सर्व समती आहे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निता विलास पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३ काळेवाडी ते बीआरटी मार्गावरील बस स्टॉपचे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.उषा काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४ आदर्शनगर चौक ते पवनानगर मंजूर डीपी रस्त्याला कै.इंदुबाई रघुनाथ काळे असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.उषा काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ५ स.नं.१७/१ साईनगर, मामुर्डी हे रहदारीचे ठिकाण असून, त्या ठिकाणी अनेक कुटूंब राहतात. तरी सर्व नागरीकांच्या विनंतीचा विचार करीता चौकास चिंतामणी राऊत चौक असे नांव स्थानिक मंडळींनी सुचविले आहे. तरी सदर चौकास चिंतामणी राऊत चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ६ मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने येणारे ऐनवेळचे विषय.

8.6.18

प्रशासन अधिकारी ता
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/९४/२०१८
दिनाक – ०८/०६/२०१८